देशोन्नती दि 13/09/23

# एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतुससह दोन आरोपी जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**नांदेड** ■ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १२ सप्टेंबर रोजी केलेल्या कारवाईत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल व काडतुस जप्त केले आहे.

शहरातील आंबेडकरनगर पाटीजवळ येथे एक इसम स्वतःचे जवळ पिस्तूल बाळगुन असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. सदर माहिती स्थागुशाचे पो.नि. द्वारकादास चिखलीकर यांनी वरीष्ठांना देवुन वरीष्ठांचे आदेशाने त्यांनी पथकाला आंबेडकरनगर पाटीजवळ रवाना केले. यावेळी पथकाने सापळा रचुन आरोपी अक्षय नामदेव वाघमारे(२३) रा. बौध्दविहारजवळ आंबेडकरनगर नांदेड यास पकडुन त्याची झडती घेतली असता, त्याच्या कमरेला लावलेले २५ हजार रुपये किंमतीचे एक गावठी बनावटीचे पिस्तूल व एक जिवंत काडतुस आढळून आले असून पोलिसांनी ते जप्त केले. त्याची अधिक चौकशी केली असता आरोपीने सदरचे पिस्तूल निहाल अनिल अटकोरे (२४) रा. आंबेडकरनगर, नांदेड याच्याकडुन विकत घेतल्याचे सांगीतले. सदरचे गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतुस जप्त केले आहे. याप्रकरणी स्थागुशाचे पोउपनि दशरथ आडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पो.नि. व्दारकादास चिखलीकर, पोउपनि दशरथ आडे, किशन मुळे, राजीव बोधगिरे, इसराईल शेख, साहेबराव कदम, अनिल बिरादार, श्रीराम दासरे, अकबर पठाण यांचा समावेश होता.

